**<u>नियमीत दिवाणी अपील क्र. ५६/२०११ मधील</u>**
**<u>निशाणी क्र. ८२ वरील आदेश</u>**
कलावतीबाई अघडते विरुध्द भानुदास अघडते
(दिनांक २४ जुलै, २०२५)

प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १४४ सहकलम १५१ अंतर्गत वाद मालमत्तेवर प्रतिवादी यांचा ताबा पुर्नःस्थापित करण्याच्या आदेशाकरीता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादीचे कथन की, वादीने प्रस्तुत दावा निरंतर मनाई हुकूम मिळणेकरीता दाखल केला असुन वादीचे लाभात तात्पुरता मनाई हुकूमाचा आदेश दिनांक ०२.०१.२०१२ रोजी पारित झालेला आहे. सदर आदेशानुसार वाद मालमत्तेवर वादीचा प्रथमदर्शनी ताबा असल्याचा निष्कर्ष नोंदवुन प्रतिवादीने वाद मालमत्तेचा ताबा वादीकडुन जबरदस्ती घेण्याचा प्रयत्न करुन नये असे न्यायालयाने आदेशीत केले आहे. सदर आदेशाची अंमलबजावणी करणेकरीता वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ प्रमाणे अर्ज करुन पेरणीकरीता पोलीस मदत मिळणेचा अर्ज केला. त्याप्रमाणे न्यायालयाने वादीला पोलीस संरक्षण दिलेले असुन त्या आदेशाची अंमलबजावणीबाबतचा अहवाल पोलीस अधिकारी, बाळापूर यांनी न्यायालयात अभिलेखावर दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी न्यायालयात दाखल केलेल्या सरकारी नोंदणीच्या कागदपत्रावरुन आणि वादीचा उलटतपास, तसेच पोलीसांनी अभिलेखावर दाखल केलेला अंमलबजावणीचा अहवाल या सर्व दस्तावेजांचे अवलोकन केले असता दावा दाखल करण्यापुर्वीपासुन वाद मालमत्तेवर प्रतिवादीचा ताबा होता असे निर्विवादपणे दिसुन येत आहे. वादीने प्रतिवादी यांना पोलीस संरक्षणाच्या आदेशाचा गैरअर्थ लावुन पोलीस संरक्षाणाच्या मदतीने आदेशाची अंमलबजावणी करते वेळी प्रतिवादीकडुन बेकायदेशीररित्या ताबा प्राप्त केलेला आहे. वादीने दावा दाखल केला त्या दिवसापासुन व खरेदी तारखेपासुन तिचा वाद मालमत्तेवर ताबा असल्याचे चुकीचे व खोटे कथन करुन न्यायालयाची दिशाभुल करुन अंतरिम आदेश प्राप्त केलेला आहे. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १४४ प्रमाणे न्यायालयास प्रतिवादीच्या वाद मालमत्तेवरील ताबा पुर्नःस्थापित करण्याचा आदेश पारित करण्याची विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जावर वादीने त्यांचे म्हणणे नि.क्र. ८४ वर दिलेले असुन अर्जातील सर्व विधाने नाकारलेली आहेत. वादीचे म्हणणे की, प्रतिवादीने केलेला अर्ज कायदेशीर नाही. वादीचे अधिकचे कथन की, प्रस्तुत दाव्यात वादी व प्रतिवादी यांनी तात्पुरता मनाई हुकूम मिळणेकरीता अनुक्रमे नि.क्र. ५ व १४ अन्वये अर्ज सादर केले. सदर अर्जावर न्यायालयाने दिनांक २१.०१.२०१२ रोजी संयुक्त आदेश करुन वादीचा नि.क्र. ५ वरील अर्ज मंजुर केला आणि प्रतिवादीचा नि.क्र. १४ वरील अर्ज नामंजुर केला. सदर संयुक्त आदेशाविरुध्द प्रतिवादीने मा. जिल्हा न्यायालय, अकोला येथे किरकोळ अपील क्र. ११/२०१२ दाखल केले. सदर अपील दिनांक ३०.०४.२०१२ रोजी खारिज करण्यात आले. त्याविरुध्द प्रतिवादीने मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपुर येथे रिट पिटीशन क्र.२८६६/२०१२ दाखल केले. सदर रिट पिटीशन देखील दिनांक ०२.०४.२०१४ रोजी मा. उच्च न्यायालयाने खारिज केले. त्यामुळे या न्यायालयाचा आदेश मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपुर पर्यंत कायम राहिला आहे व त्या आदेशात वरिष्ठ न्यायालयाने कोणताही बदल केलेला नाही. त्यामुळे प्रतिवादीने केलेला दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १४४ सहकलम १५१ प्रमाणेचा अर्ज न्यायप्रक्रियेत बसत नाही. दिनांक ३०.०४.२०१२ रोजी या दाव्यामध्ये पारित झालेल्या नि.क्र. ५ नि.क्र. १४ वरील संयुक्त आदेशाविरुध्द मा. उच्च न्यायालयात रिट पिटीशन दाखल केली त्यानंतर प्रतिवादीने या न्यायालयात दाखल केलेला नि.दि.दावा क्र. ९४/२०१२ न्यायप्रविष्ठ असतांना दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २३ नियम ३ब प्रमाणे काढुन घेण्याची परवागीकरीता नि.क्र. ३१ वर अर्ज सादर केला. सदर अर्ज न्यायालयाने दिनांक ०९.१०.२०२४ रोजी आदेश पारित करुन खारिज केला. त्यानंतर त्या दाव्यातील वादी म्हणजेच या दाव्यातील प्रतिवादी हेतुपुरस्परपणे न्यालयात हजर राहिले नाही. म्हणुन न्यायालयाने दिनांक ०६.०३.२०२५ रोजी दावा खारिज केला. प्रस्तुत अर्ज प्रतिवादीने फक्त दावा प्रलंबित ठेवण्याच्या गैरहुतुने दाखल केलेला असुन सदर अर्जात कोणतेही तथ्य नाही. म्हणुन प्रस्तुत अर्ज खर्चासह खारिज करण्यात यावा.

**४.** उभय पक्षांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी तर्फे विधिज्ञ श्री. काणे यांनी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे जयराम जेठमल तापडीया विरुध्द कमलकिशोर भागीरथ अग्रवाल या न्यायनिवाडयावर भिस्त ठेवली.

**५.** अभिलेखाचे अवलोकन केले. चर्चेला सुरुवात करण्यापुर्वी संबंधीत तरतुद दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १४४, या ठिकाणी नमुद करणे आवश्यक आहे ती खालीलप्रमाणे–

> **१४४. प्रत्यास्थापनाकरिता अर्ज :–** (१) एखादा हुकूमनामा [किंवा आदेश] [कोणत्याही अपिलात, पुनःनिरीक्षणात किंवा अन्य कार्यवाहित बदलण्यात आली असेल किंवा फिरवण्यात आला असेल अथवा त्या प्रयोजनार्थ मांडलेल्या कोणत्याही दाव्यामध्ये तो रद्द ठरविण्यात आला असेल अथवा त्यात फेरबदल करण्यात आला असेल तर ज्या न्यायालयाने असा आदेश किंवा हुकूमनामा काढला असेल त्या न्यायालयाने], प्रत्यास्थापनाच्या किंवा अन्य कोणत्याही लाभास हक्कदार असलेल्या कोणत्याही पक्षकाराच्या विनंतीवरुन अशा प्रकारे प्रत्यास्थापन घडवुन आणले पाहिजे, जेणेकरुन असा हुकूमनामा [किंवा आदेश] काढला नसता अथवा [त्याचा जो भाग बदललेला आहे, फिरवलेला आहे, रद्द ठरविलेला आहे किंवा ज्यात फेरफार केलेला आहे] तो तसा केला नसता तर, पक्षकार जसे राहिले असते त्याचप्रकारे ते पुर्वपदावर येतील, आणि या प्रयोजनार्थ न्यायालयास दावा खर्चाच्या परताव्याचे आणि [असा हुकूमनामा किंवा आदेश बदलल्यामुळे, फिरवल्यामुळे, रद्द ठरविल्यामुळे किंवा त्यात फेरफार केल्यामुळे परिणामी] जे योग्यप्रकारे देय होईल ते व्याज, नुकसानभरपाई, भरपाई आणि दरम्यानचे लाभ याच्या प्रदानाचे आदेश असे कोणतेही आदेश काढता येतील.

**६.** उपरोक्त तरतुदीचे अवलोकन केले असता असे स्पष्ट होते की, कनिष्ठ न्यायालयाने पारित केलेला आदेश किंवा हुकूमनामा वरिष्ठ न्यायालयाने रद्द केला असेल किंवा फिरवला (reverse) असेल तर ज्या न्यायालयाने आदेश किंवा हुकूमनामा पारित

केला आहे त्या न्यायालयास पक्षकाराच्या पुनःस्थापनेच्या अर्जावर आदेश पारित करुन हक्कदार व्यक्तीला मिळकतीच्या ताब्यात सदर तरतुदी अन्वये पुनःप्रस्थापित करता येईल.

**७.** मी प्रतिवादी तर्फे दाखल न्यायनिवाडयाचे वाचन केले. सदर न्यायनिवाडयामध्ये कनिष्ठ न्यायालयाचा निष्कासन हुकूमनामा (eviction decree) वरिष्ठ न्यायालयात आव्हानित करण्यात आला. वरिष्ठ न्यायालयात स्थगितीचा अर्ज प्रलंबित असतांना धनको यांनी हुकूमनाम्याची अंमलबजावणी करणार नाही, अशी हमी दिली. असे असतांनाही ऋणकोला दरखास्तची अंमलबजावणी करुन मिळकतीतुन बेदखल करण्यात आले, त्यावेळी मा. उच्च न्यायालयाने दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम १५१ चा वापर करुन ऋणकोला मिळकतीच्या ताब्यात पुर्नस्थापित करण्याचा वरिष्ठ न्यायालयाचा आदेश योग्य होता आणि त्यावेळी दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १४४ लागु होत नाही असे प्रतिपादन केलेले आहे. प्रस्तुत दाव्याची परिस्थिती ही न्यायानिवाडयात नमुद परिस्थितीपेक्षा भिन्न आहेत. त्यामुळे मा. उच्च न्यायालयाच्या सदर न्यायनिवाडा या ठिकाणी लागु होत नाही. दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १४४ मधील तरतुद वरिष्ठ न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाचा निकाल किंवा आदेश रद्दबादल केला किंवा फेरबदल केला असेल, तेव्हा लागु होते.

८. प्रस्तुत दाव्यातील परिस्थितीचा विचार केला असता प्रस्तुत दाव्यात वादी व प्रतिवादी यांनी दोन्ही पक्षकारांनी अंतरिम मनाई हुकूम मिळणेकरीता अर्ज दाखल केले होते. सदरचे दोन अर्ज या न्यायालयाने संयुक्त आदेश पारित करुन वादीचे लाभात अंतरिम मनाई हुकूमाचा आदेश केला आणि प्रतिवादी यांचा अंतरिम मनाई हुकूमाचा अर्ज खारिज केला. सदर संयुक्त आदेशाविरुध्द प्रतिवादीने मा. जिल्हा न्यालयात किरकोळ अपील दाखल केले, परंतु वरिष्ठ न्यायालयात देखील या न्यायालयाचा आदेशात कोणताही फेरबदल न करता प्रतिवादीचे किरकोळ अपील नामंजुर केले. त्यामुळे या न्यायालयाचा आदेश कायम राहिलेला आहे त्यात कोणताही फेरबदल करण्यात आलेला नाही. त्यामुळे प्रस्तुत दाव्याचा निकाल/हुकूमनामा किंवा आदेश वरिष्ठ न्यायालयाने रद्द केलेला नाही किंवा त्यात कोणताही फेरबदल केलेला नाही. म्हणुन प्रतिवादीचा प्रस्तुतचा अर्ज न्यायप्रक्रियेत बसत नाही. सदरचा दावा निरंतर मनाई हुकूम मिळणेकरीता दाखल

असुन सन २०११ पासुन प्रलंबित आहे. दावा वादीचे साक्षीदाराच्या प्रतिवादीकडुन उलटतपासणीकरीता प्रलंबित असतांना देखील प्रतिवादीने सदर अर्ज प्रकरण प्रलंबित ठेवण्याच्या उददेशाने केलेला असल्याचे प्रथमदर्शनी अभिलेखावरुन दिसुन येते. त्यामुळे दाव्याचा कालावधी आणि दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी यांचा अर्ज खारिज करणेस पात्र आहे. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. सदर अर्ज नामंजुर करण्यात येतो.

२. प्रकरण १० वर्ष जुने असल्याने प्रतिवादीने दावा निकाली करण्यासाठी न्यायालयास सहकार्य करावे.

PATIL DIPMALA MAHENDRA

Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2025.07.25 12:17:31 +0530

दिनांकः २४.०७.२०२५
बाळापूर.

(श्रीमती डी. एम. पाटील)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, बाळापूर.

| | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original order. | | |
| Name of the Court | :- | **Smt. D. M. Patil**<br>Civil Judge, J.D. & J.M.F.C., Balapur |
| Name of the Stenographer | :- | A.S.Gawali |
| Date of Decision | :- | 24/07/2025 |
| Order signed by P.O on | :- | 24/07/2025 |
| Order uploaded on | :- | 25/07/2025 |